म. टा. पु. पा. १.

# मिरा-भाईंदरकरांच्या सेवेत मेपासून ई-बस

म. टा. वृत्तसेवा,मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरकरांच्या सेवेत येत्या मे महिन्यापासून इलेक्ट्रिक बस दाखल होणार आहेत. पालिकेने इलेक्ट्रिक बस कंपनीला ५७ बस उपलब्ध करून देण्याचा कार्यादेश दिला. मागील काही वर्षांत पालिकेच्या परिवहन सेवेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची वाढलेली संख्या लक्षात घेता, अतिरिक्त बसची गरज भासत आहे. त्यामुळे आता ई-बस उपलब्ध झाल्यास नागरिकांना चांगली सुविधा मिळणार आहे.

मिरा-भाईंदर पालिकेच्या परिवहन सेवेत ७४ बस आहेत. यातील ७० बस ठाणे, मुंबई व शहरांतर्गत मार्गांवर चालवल्या जातात. उर्वरित चार बस राखीव ठेवण्यात आल्या आहेत. करोनाकाळानंतर मागच्या काही वर्षांच्या तुलनेत परिवहन सेवेतून दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या ही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ती सद्यस्थितीत सुमारे ९० हजारांच्या घरात गेली आहे. परिणामी पालिकेकडे उपलब्ध असणाऱ्या बस अपुऱ्या पडू लागल्या आहेत. नवीन मार्गांवरदेखील बसची मागणी वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर पालिकेला हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून प्राप्त झालेल्या निधीतून ५७ इलेक्ट्रिक बस जीसीसी (ग्रॉस कॉस कॉन्ट्रॅक्ट) तत्त्वावर घेण्याचे प्रशासनाकडून ठरवण्यात आले. मागच्या वर्षभरापासून निविदा प्रक्रिया व इतर कार्यवाही केली जात होती. यामध्ये पात्र ठरलेल्या पीनाकल मोबिलिटी सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला नुकताच कार्यादेश देण्यात आला.यात मध्यम आकाराच्या विनावातानुकूलित ३२, वातानुकूलित १०, तर लहान आकाराच्या १५ बसचा समावेश आहे. या पहिल्या टप्प्यात मे महिन्यात उपलब्ध करून दिल्या जाणार असून उर्वरित बस चार महिन्यांत दिल्या जाणार आहेत. या बस पुरवणाऱ्या कंपनीला २८ कोटींचे अनुदान दिले जाणार आहे. तसेच बस चालवणे, त्यांची देखभाल, दुरुस्ती व वीज देयक आदींवर होणारा खर्चदेखील बस पुरवणारी कंपनीच करणार आहे. तिकिटातून प्राप्त झालेले पैसे हे पालिका स्वतःकडे ठेवणार असून त्यातून प्रतिकिलोमीटरप्रमाणे पैसे कंत्राटी कंपनीला अदा करणार आहे.

## पालिका प्रशासनाकडून बस कंपनीला कार्यादेश

> “ मे महिन्यात काही इलेक्ट्रिक बस सेवेत दाखल करून घेतल्या जाणार आहेत. नवीन मार्गांवरदेखील बस उपलब्ध करून देता येतील.
>
> - दिलीप ढोले, आयुक्त, मिरा-भाईंदर महापालिका

## पोलिस पदांसाठी लेखी परीक्षा

मिरा-भाईंदर : मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाकडून पोलिस शिपाई व वाहनचालकांची पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या अंतर्गत वाहनचालकपदासाठी मैदानी चाचणीत अपेक्षित गुण मिळवलेल्या पात्र उमेदवारांची रविवारी सकाळी लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. ही परीक्षा मिरा रोडच्या रामनगर येथील पोलिस आयुक्तालयात पार पडणार आहे. तर शिपाईपदासाठी २ एप्रिलला परीक्षा होणार आहे.

सकाळी साडेसहा वाजेपर्यंत विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या, अशी माहिती पोलिस आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा. नं. १८.

# पोलीस आयुक्तालयात महत्त्वाच्या विभागांचा अभाव

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**पालघर :** मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेला दोन वर्षे उलटूनही अनेक महत्त्वाचे विभाग सुरू झालेले नाहीत. त्यामध्ये शीघ्र कृती दल, बॉम्बशोधक पथक तसेच वाहन विभागांचा समावेश आहे. विभाग सुरू करण्यासाठी निधी देण्याची मागणी आयुक्तालयातर्फे करण्यात आली आहे.

पालघर आणि ठाणे ग्रामीणचे विभाजन करून २ ऑक्टोबर २०२१ मध्ये मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाली. शहरी आणि ग्रामीण आणि सागरी अशी पोलीस आयुक्तालयाची रचना आहे. पोलीस आयुक्तालयात १८ पोलीस ठाणी असून ३ परिमंडळे आहेत. आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर वसई विरार शहरात मांडवी, आचोळे, पेल्हार आणि नायगाव ही पोलीस ठाणी तयार करण्यात आली. विरारमध्ये बोळिंज पोलीस ठाणे प्रस्तावित आहे, तर मीरा भाईंदर शहरात खारीगाव आणि काशीगाव ही दोन पोलीस ठाणी प्रस्तावित आहे. सध्या पोलीस आयुक्तालयात अनेक महत्त्वाचे विभाग सुरू झालेले नाहीत. त्यात शीघ्र कृती दल (क्यूआरटी) आणि बीडीडीएस अर्थात बॉम्बशोधक आणि बॉम्बनाशक पथकाचा समावेश आहे.

शहरात अनेक अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे कार्यक्रम होत असतात. अशावेळी कार्यक्रमापूर्वी तपासणी करण्यासाठी श्वानपथक तसेच बॉम्बशोधक पथकाची आवश्यकता असते. याशिवाय गुन्ह्याची घटना घडल्यानंतर तपासासाठीदेखील श्वान पथकाची गरज भासते. ते ठाण्याहून मागवावे लागतात. त्यामुळे वेळ वाया जातो. पोलिसांच्या वाहनांच्या देखभाल दुरुस्ती तसेच नियोजनासाठी वाहन विभाग असतो, पण त्यासाठी पद मंजूर नाही. यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. हे विभाग सुरू करावेत तसेच यासाठी निधी मिळावा अशी मागणी आयुक्तालयातर्फे शासनाकडे करण्यात आली आहे.

मुंबई

# बहुमजली वाहनतळ कागदावरच

## जागेची अडचण

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वसई, विरार शहरात वाहने उभी करण्यासाठी पालिकेकडून बहुमजली वाहनतळ तयार केले जाणार होते. मात्र त्यासाठी पालिकेला आता जागाच मिळत नसल्याने हे बहुमजली वाहनतळ कागदावरच राहिले आहेत. यामुळे वाहतूक कोंडीची समस्या कायम आहे.

वसई, विरार शहराचे झपाट्याने नागरीकरण वाढत आहे. वाहनतळ नसल्याने बहुतेक वाहने ही रस्त्यावर उभी केली जातात. काही वाहने रस्त्याच्या कडेला, रस्त्यावर, पदपथाच्या बाजूला, रेल्वे स्थानकाच्या लगतच्या भागात, मुख्य रस्त्याच्या ठिकाणी वाहने सर्रासपणे उभी केली जात आहेत. यामुळे मार्गात अडथळे निर्माण होऊन वाहतूक कोंडीच्या समस्येला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.

कोंडीवर उपाययोजना म्हणून बहुमजली वाहनतळ उभे करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. मात्र आता बहुमजली वाहनतळ उभी करण्यासाठी आवश्यक असलेली जागाच मिळत नसल्याने अडचण निर्माण झाली आहे. वाहनतळाची व्यवस्था करण्यासाठी पालिकेने प्रयत्नसुद्धा सुरू केले होते. जवळपास ७ ठिकाणी जागाही बघितल्या होत्या. मात्र नागरिक टीडीआर घेण्यास तयार नाहीत त्यामुळे अडचणी निर्माण होत असल्याचे महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले आहे.

> “वाहनतळ व्यवस्था करण्यासाठी प्रयत्न सुरूच आहेत. जर योग्य जागा मिळाल्या तर वाहनतळाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. - अनिलकुमार पवार, आयुक्त वसई विरार महापालिका

### बेकायदा वाहनतळांचे पेव

वाहने उभी करण्यासाठी अधिकृत वाहनतळ नसल्याने अडचणी येत आहे. काही ठिकाणी शासकीय जागा, मोकळ्या असलेल्या जागांवर अतिक्रमण करून त्या जागेवर थेट वाहनतळ तयार केले आहे. याकडे शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष झाले असल्याने याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. सुरुवातीला मोकळ्या जागेत व शासकीय जागेत विनामूल्य वाहने उभी करीत होते.आता अतिक्रमण झाल्याने पावती फाडून वाहने उभी करावी लागत आहेत.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा.नं.१८.

# महामार्गावर विरार फाटा येथे ट्रेलरचा अपघात



**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** दुभाजकांच्या अपुऱ्या उंचीमुळे महामार्गावरील विरार फाटा येथे ट्रेलर अनियंत्रित होऊन अपघात घडला आहे. शुक्रवारी सायंकाळी चारच्या सुमारास ही घटना घडली.

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर दुभाजकांची उंची अपुरी असल्याने एका वाहिनीवरून दुसऱ्या वाहनीवर जाऊन अपघात होण्याच्या घटना समोर येत आहेत.

शुक्रवारी चारच्या सुमारास गुजरात वाहिनीवरून एम एच ०४ जी आर ९८१७ हा ट्रेलर अहमदाबाद दिशेने भरधाव वेगाने निघाला होता. पुढे चालणाऱ्या एका कारने अचानक ब्रेक घेतल्याने ट्रेलर अनियंत्रित होऊन दुभाजकाला धडकला.

मात्र सुदैवाने याच वेळी दोन्ही वाहिनींवर वाहने नसल्याने मोठा अपघात टळला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत क्रेनच्या साहाय्याने ट्रेलर बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

या घटनेनंतर पुन्हा एकदा दुभाजकांच्या अपुऱ्या उंचीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# सुशोभीकरण केलेल्या चौकांचे विद्रूपीकरण

## विरार उड्डाणपुलावरील राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमा हटवल्या

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्चून शहराचे सुशोभीकरण हाती घेतले आहे. मात्र नागरिकांकडूनच या सुशोभीत केलेल्या भिंती आणि चौकांचे विद्रूपीकरण करण्यात येत आहे. नागरिक थुंकत असल्याने पालिकेने नाइलाने विरारमधील उड्डाणपुलावरील राष्ट्रपुरुषांची चित्रे हटवली आहेत.

महापालिकेने शहर स्वच्छ आणि सुंदर करण्यास सुरुवात केली आहे. त्याअंतर्गत शहराच्या नाक्यांवर शिल्प आणि देखावे उभारण्यात येत आहेत. शहरातील सार्वजनिक भिंती, उड्डाणपुलांवर चित्रे काढण्यात येत आहेत, तर कचरा स्वच्छ करून सेल्फी पॉइंट बनविण्यात आले आहेत. मात्र नागरिकांकडून या सुशोभीकरण केलेल्या भिंतीवर थुंकण्याचे प्रकार वाढले आहेत. माणिकपूर येथे पालिकेने दुभाजकांवर वारली चित्रे काढली होती; परंतु त्यावर वाहनचालकांनी गुटखा आणि पान खाऊन थुंकल्याने भिंती खराब झाल्या होत्या. विरारच्या उड्डाणपुलावर पालिकेने विविध राष्ट्रपुरुषांची चित्रे काढली होती. त्यात लता मंगेशकर, सचिन तेंडुलकर, अब्दुल कलाम आझाद यांचा समावेश होता. मात्र वाहनचालकांनी त्यांच्यावरही थुंकण्यास सुरुवात केली. त्यामुळे नाइलाजाने पालिकेने या राष्ट्रपुरुषांची चित्रे हटवून त्यावर फुलांची चित्रे काढली आहेत. नागरिकांकडून शहराच्या सुंदर ठिकाणांचे अशा प्रकारे विद्रूपीकरण होत असल्याने पालिकेची डोकेदुखी वाढली आहे.

शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झाली असून परराज्यातील लोक मोठ्या संख्येने राहात आहे. त्यांना शहराबद्दल आस्था आणि आपलुकी नसते. त्यामुळे सर्रास ते शहर अस्वच्छ करत असल्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

Scanned with CamScanner

लोकमत ५-पा-३०

# उत्तनमधील रहिवाशांची कचऱ्याच्या त्रासातून सुटका

## कचऱ्यावर होणार प्रक्रिया : ४० कोटी ६६ लाखांचा ठेका

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड** : मीरा भाईंदर महापालिकेच्या उत्तन येथील डम्पिंग ग्राउंडवर प्रक्रिया न करताच टाकला गेलेला आणि वर्षानुवर्षे साचून राहिलेल्या नऊ लाख नऊ हजार ६३० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी ४० कोटी ६६ लाखांचा ठेका पालिकेने दिला आहे. त्यामुळे कचऱ्याच्या डोंगरास आग लागून होणाऱ्या सततच्या त्रासातून लोकांची सुटका होईल, अशी आशा आहे.



मीरा भाईंदर महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी राज घरत यांनी सांगितले की, उत्तन डम्पिंग येथे गेल्या अनेक वर्षांपासून साचून राहिलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आयुक्त दिलीप ढोले यांनी पुढाकार घेऊन निविदा प्रसिद्ध केली होती.

साचलेल्या कचऱ्याच्या डोंगरास सातत्याने आग लागत असल्याने परिसरात प्रचंड घातक धुराचे प्रदूषण पसरत असते. शिवाय लिचेटमुळे शेतजमीन नापीक झाली आहे. डम्पिंगवर उर्वरित शिल्लक असलेल्या घनकचऱ्याचे मोजमाप हे पुण्याच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्याकडून प्रमाणित करून घेण्यात आले होते. १० ऑगस्ट २०२२ च्या पत्रानुसार राज्य शासनाने साचलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंगसाठी ४० कोटी ६६ लाखांच्या खर्चास मान्यता दिली. त्या कामासाठी आता मे. ई. बी. एन्व्हायरो बायोटेक प्रा. लि. या ठेकेदार कंपनीस कार्यादेश देण्यात आला आहे. या बायोमायनिंग कामास सुरुवात करण्यात आली आहे. कामाची मुदत २१ जून २०२४ पर्यंत असली तरी यंदाचा पावसाळा सुरू होण्यापूर्वी हे काम संपवण्यासाठी आयुक्तांनी कंत्राटदाराला सांगितले आहे.

कंत्राटदार बायोमायनिंग करणार म्हणजे वर्षानुवर्षे साचून राहिलेला कचरा चाळणी करून त्यातील खत वेगळे करणे आणि प्लास्टिक मटेरियल व इतर वस्तू वेगळ्या करून त्या प्रक्रियेसाठी पाठविल्या जातील. त्यातील न कुजणारे ज्वलनशील पदार्थ आरडीएफ या स्वरूपात जवळपासच्या सिमेंट फॅक्टरीमध्ये इंधन म्हणून वापरले जातील. पावसाळ्यापूर्वी सदर काम पूर्ण झाले तर उत्तन येथील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

लोकमत पा. नं. ५.

# ५ वर्षे वयाचा चिमुकला झाला चाइल्ड कॉन्स्टेबल

**सरगुजा** : एका पोलिस अधिकाऱ्याचे अपघातात निधन झाल्यानंतर त्यांच्या पाच वर्षे वयाच्या लहान मुलाची पोलिस दलात 'चाइल्ड कॉन्स्टेबल' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नमन राजवाडे असे या मुलाचे नाव असून तो बालवाडीत शिकत आहे. छत्तीसगड येथील सरगुजा येथील तो रहिवासी आहे.



नमन याचे वडील व पिलीस अधिकारी राजकुमार राजवाडे यांचे एका अपघातात निधन झाले. त्यानंतर प्रशासनाने अनुकंपा तत्त्वावर नमन याची पोलिस दलात चाइल्ड कॉन्स्टेबलपदी नियुक्ती केली. राजवाडे यांची पत्नी नीतू यांनी सांगितले की, मुलगा नमन याच्याबाबत प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाने आम्हाला दिलासा मिळाला आहे.

पोलिस अधीक्षक भावना गुप्ता यांनी सांगितले की, पोलिस मुख्यालय व प्रशासनाने दिलेल्या सूचनांनुसार नमन याची चाइल्ड कॉन्स्टेबलपदी नियुक्ती करण्यात आली. राजकुमार यांचा मुलगा नमनबाबत जो निर्णय घेण्यात आला तो नियमांना धरूनच आहे. एखादा पोलिस अधिकारी किंवा कॉन्स्टेबल पोलिस सेवेत असताना मरण पावला व त्याचा वारसदार १८ वर्षांपेक्षा कमी वयाचा असेल तर त्याची चाइल्ड कॉन्स्टेबल म्हणून नियुक्ती करण्यात येते. (वृत्तसंस्था)

Scanned with CamScanner

पुण्यनगरी १५-३-१९.

# दफनभूमीसाठी पर्यायी जागेचा विचार करा

## पालिका आयुक्तांना पोलिसांचे पत्र

**मीरा रोड :** पेणकर पाडा येथे दफनभूमीसाठी आरक्षित असलेल्या जागेत दफनभूमी बनवण्यास स्थानिक नागरिकांचा विरोध आहे. स्थानिकांचा विरोध लक्षात घेता, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी दफनभूमीसाठी दुसरीकडे पर्यायी जागेचा विचार करावा, असे पालिका आयुक्तांना पत्राद्वारे कळवले आहे.

मीरा-भाईंदरमध्ये दफनभूमीसाठी जागा अपुरी पडत असल्यामुळे मुस्लिम समाजाकडून दफनभूमी बनवण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यांच्या मागणीनुसार पेणकर पाडा येथे दफनभूमीसाठी आरक्षित असलेल्या जागेवर दफनभूमी बनवण्याचा महापालिकेने निर्णय घेतला आहे. परंतु या दफनभूमीसाठी स्थानिक नागरिकांनी विरोध केला आहे. त्यामुळे आयुक्तांनी पोलीस बंदोबस्त देण्याची पोलिसांना मागणी केली होती. त्यानुसार स्थानिक काशिमीरा पोलिसांनी रहिवाशांची बैठक बोलावली. यावेळी रहिवाशांनी दफनभूमीला विरोध करत आंदोलन करण्याचा इशारा दिला. दोन वर्षांपूर्वी देखील याच दफनभूमीवरून वाद निर्माण झाला होता. त्यामुळे पुन्हा वाद निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. तसा अहवाल स्थानिक पोलिसांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिला होता. या अहवालानुसार, पोलिसांनी राज्यभरातील धार्मिक, राजकीय गोष्टींवरून घडलेल्या विविध घटना, आगामी सण-उत्सव व स्थानिकांचा विरोध या मुद्द्यांचा विचार करून, दफनभूमीसाठी पेणकरपाड्याऐवजी पर्यायी जागेचा विचार करण्याची महापालिका प्रशासनाला सूचना केली आहे. आता महापालिका प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यानुसार पुढील दिशा ठरवता येईल, असे रहिवाशांनी सांगितले.

# भाईंदरमधून दोन बालमजुरांची सुटका

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीत बालमजुरांकडून काम करून घेणाऱ्या दोन कंपनी मालकांवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने कारवाई करून दोन बालमजुरांची सुटका केली.

अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना बी. बी. के. प्लास्टिक कंपनी व प्रिन्स मेटल कंपनी, भाईंदर उद्योग नगर, मिलन हॉलच्या पाठीमागे, भाईंदर पूर्व या दोन्ही कंपनीचे चालक, मालक व मॅनेजर अल्पवयीन मुलांना अनधिकृतपणे कामावर ठेवून त्यांच्याकडून सक्तीने बेकायदेशीरपणे जीवितास धोका निर्माण होईल, असे काम करून घेत असल्याची माहिती मिळाली. पो.नि. समीर अहिरराव यांनी पथकासह बी. बी. के. प्लास्टिक कंपनीमध्ये एक अल्पवयीन मुलगा व प्रिन्स मेटल कंपनी, भाईंदर उद्योग नगर, मिलन हॉलच्या पाठीमागे, नवघर, भाईंदर पूर्व येथे एक अल्पवयीन मुलगा हे कंपनीमध्ये स्टील वाटी व स्टील चहा कपास हॅण्डल बसवण्याचे काम प्रेस मशीनवर करत असताना दिसून आले. त्यावेळी कारवाई करून २ अल्पवयीन मुलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने ताब्यात घेण्यात आले. त्याबाबत बी.बी.के. कंपनीचे मालक, चालक बौतुला सत्तार खान तसेच प्रिन्स मेटल कंपनीचे मॅनेजर जोखन मुन्नीलाल प्रसाद व मालक नथुराम पुरोहित यांच्याविरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विरारमध्ये तरुणीवर सामूहिक अत्याचार

## दोन नराधमांना अटक

**नालासोपारा :** विरारमध्ये मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर मित्राला बांधून सामूहिक अत्याचार केल्याची घटना घडली. याप्रकरणी विरार पोलिसांकडून दोन नराधमांना अटक केली आहे.

विरारमध्ये जंगलात एक २० वर्षीय तरुणी मित्रासोबत फिरायला गेली होती. तिच्यावर सामूहिक अत्याचाराची घटना घडली असून विरार पोलिसांनी अवघ्या काही तासांत याप्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे. यश शिंदे आणि धीरज सोनी अशी या दोघांची नावे आहेत.

बुधवारी दुपारी पीडित तरुणी ही आपल्या मित्रासोबत विरार पूर्वेच्या साईनाथ नगर येथील डोंगराळ भागात फिरण्यासाठी गेली होती. यावेळी जंगलात कोणी नसल्याचा फायदा घेत तेथे दबा धरून बसलेल्या दोन आरोपींनी तरुणीचे फोटो काढले व ते व्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार केला. याला विरोध करणाऱ्या तिच्या मित्राला मारहाण करून बांधून ठेवले आणि या तरुणीवर अत्याचार केला. तिचा मित्र नग्नावस्थेत डोंगराखाली आला असता काही नागरिकांनी त्याला पाहिले व त्यानंतर सर्व प्रकार उघडकीस आला. पीडित तरुणी व तिच्या मित्राने विरार पोलिसांना दिलेल्या तक्रारीनंतर विरार पोलिसांनी सामूहिक अत्याचार, लूट, मारहाण अशा विविध कलमन्वाये गुन्हा दाखल केला असून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. शुक्रवारी त्यांना वसई सत्र न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना २७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

Scanned with CamScanner

सामना पा. नं ७.

रूळ ओलांडल्याने घात; शॉर्टकट जीवावर बेतला

# भरधाव एक्स्प्रेसने तिघांना चिरडले

वसई, दि. २४ (सा.वा.) – रेल्वे रूळ ओलांडून प्लॅटफॉर्म गाठण्याचा शॉर्टकट वसईतील एकाच कुटुंबातील तिघांच्या जीवावर बेतला आहे. भरधाव एक्स्प्रेसने चिरडल्याने अजितकुमार पटेल (२८), सीमादेवी पटेल (२६), आर्यन पटेल (३ महिने) यांचा जागीच मृत्यू झाला. गुरुवारी रात्री १२.२० च्या सुमारास विरार स्थानकातील फलाट क्रमांक चार नजीक ही हृदयद्रावक घटना घडली. या घटनेमुळे पटेल कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

वसई परिसरात पटेल कुटुंबीय राहात होते. अजितकुमार हे आपल्या पत्नी व मुलाला घेण्यासाठी सुरतला गेले होते. सुरतवरून पटेल कुटुंबीय विरार स्थानकात आले होते. वसईला जाणारी लोकल पकडण्यासाठी ब्रीजने न जाता ते रेल्वे रुळावर उतरले. ते फलाट क्रमांक पाचवरून चारवर जाण्यासाठी रेल्वे रूळ ओलांडत होते. नेमकी याच वेळी फलाट क्रमांक चारवरून भरधाव पुणे–वेरावळ एक्स्प्रेस येत होती. काही कळायच्या आतच ही भरधाव एक्स्प्रेस पती, पत्नी आणि तीन महिन्यांच्या चिमुकल्याला चिरडून निघून गेली. या भयंकर दुर्घटनेत तिघांचाही जागीच मृत्यू झाला.

### विरारकर हळहळले

या घटनेची माहिती रेल्वे पोलिसांना देण्यात आली. त्यानुसार रेल्वे पोलिसांनी तिघांचे मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. याप्रकरणी वसई रेल्वे पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन इंगवले यांनी दिली आहे. या दुर्दैवी घटनेने विरारकर हळहळले. रेल्वे रूळ ओलांडणे हे केवळ बेकायदा नव्हे तर अधिक धोकादायक आहे. त्यामुळे प्रवाशांनी रेल्वे रूळ ओलांडून प्रवास करू नये, असे आवाहन रेल्वे पोलिसांनी केले आहे.

पुढारी पा. नं. ११.

## उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा आयुक्तांचे हस्ते सन्मान

**मिरारोड :** मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील फेब्रुवारी महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यामध्ये अधिकारी, अंमलदार यांनी महिनाभरात केलेल्या कामाचा आढावा घेण्यात येतो. आयुक्तलयाच्या हद्दीत १७ पोलीस ठाणे असून दररोज वेगवेगळे गुन्हे दाखल होत असतात. पोलीस त्यांच्या बुद्धीच्या व कौशल्याच्या बळावर तपास करून गुन्हे उघडकीस आणतात. फेब्रुवारी महिन्याच्या गुन्हे आढावा बैठकीत गुन्हे शाखा कक्ष ०१, तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे शाखा कक्ष ०२, गुन्हे शाखा कक्ष ०३, सायबर विभाग यांना मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये गुन्ह्याची उत्कृष्ट उकल केल्या बद्दल प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला आहे. मीर-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तलयामार्फत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रत्येकाचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत सत्कार केला जातो जेणेकरून त्यांनी केलेल्या कामाची प्रशंसा केल्याने त्यांना काम करण्यास प्रोत्साहन दिले जाते.

पुढारी पा. नं. ११.

## नायगाव पोलीस ठाणे निर्मितीने समस्या सुटणार

मिरारोड : मीरा भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयामध्ये नव्याने नायगांव पोलीस ठाणे सुरू करण्यात आले असून त्याचे पोलीस महासंचालक रजनिश सेठ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे.

पोलीस ठाण्याची निर्मिती झाल्यानंतर आठवड्याभरात १० गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ४ गुन्हे पोलिसांनी उघडकीस आणले आहेत. त्यामुळे नव्याने सुरू झालेले पोलीस ठाणे नागरिकांना फायदेशीर ठरत आहे. नायगाव पोलीस ठाणे हद्दीत लोकसंख्या वाढ लक्षात घेता गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ होत आहे. शहरात सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून कॅमेरे बसण्याची गरज आहे.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत पूर्वी १६ पोलीस ठाणे होती. आता नवीन नायगाव पोलीस ठाण्याच्या निर्मितीनंतर १७ पोलीस ठाणे कार्यरत आहेत.

Scanned with CamScanner

पुढारी पु.पा. ३०

# रानमांजरासाठी पिंजरा लावला, अडकला बिबट्या

## बिबट्या जेरबंद झाल्याने मोर्वा-गोराईकरांनी सोडला सुटकेचा निश्वास

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**


गेल्या वर्षभरापासून उत्तन, गोराई परिसरात वावर असलेला बिबट्या अखेर पालखाडी परिसरातील शेतामध्ये डुकर व रानमांजर पकडण्यासाठी लावलेल्या पिंजऱ्यात शुक्रवारी रात्रीच्या सुमारास अडकला. यामुळे परिसरातील लोकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

पिंजऱ्यात अडकलेला बिबट्या मादी प्रजातीचा असून ती सुमारे चार वर्षांची असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले. पिंजऱ्यात अडकताच स्वतःला सोडविण्यासाठी केलेल्या प्रयत्नात बिबट्याच्या डोक्याला व नाकाच्या एका बाजूला जखम झाली. या बिबट्याने गेल्या वर्षभरापासून स्थानिकांमध्ये दहशत निर्माण केली होती. उत्तन परिसरात शेती केली जात असल्याने डेनो भोन्साल्वीस शेतकऱ्याने आपल्या शेताची नासधूस करणाऱ्या डुकरांना तसेच तेथील कोंबड्या फस्त करणाऱ्या रानमांजराला पकडण्यासाठी शेतातच साधा पिंजरा लावला होता.

पिंजऱ्यात रानमांजराला आकर्षित करण्यासाठी कोंबडी बांधण्यात आली होती. मात्र त्यात रानमांजर व डुकराऐवजी मादी बिबटच जेरबंद झाली. हि बिबट गेल्या वर्षभरापासून मोर्वा ते गोराई दरम्यानच्या जंगलात वावरत होती. काही महिन्यापूर्वी ती उत्तन-गोराई मार्गावरील रामरतन शाळेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती. अलिकडच्या काळात तीचा चोपरा गावात वावर वाढला होता. तिने गावातील अनेक कोंबड्या व बकऱ्या फस्त केल्या. याबाबत वनविभागाला माहिती देण्यात आली असता वनविभागाने गावात कॅमेरे बसविले. त्यातही हि बिबट कैद झाली होती. मात्र वनविभागाने तिला जेरबंद करण्यासाठी ठोस कार्यवाही केली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला.

### पिंजरा गैर असल्याचा दाव्याने पोलिसांची कारवाई

डुकर व रानमांजर पकडण्यासाठी भोन्साल्वीस यांनी लावलेल्या पिंजऱ्यात मादी बिबट्या अडकल्यानंतर उत्तन सागरी पोलिसांनी भोन्साल्वीस यांच्यावर कारवाई केली. त्यात लावलेला पिंजरा गैर असल्याचा दावा करीत त्यामुळे बिबट्याच्या जिवाला धोका उद्भवण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मात्र पोलिसांच्या या कारवाई विरोधात ग्रामस्थ संतप्त झाले असून त्यांनी बिबट्याकडून लोकांवर हल्ला होण्याची वाट वनविभाग व पोलीस पाहत होते का, असा प्रश्न उपस्थित केला आहे.



बिबट्याला वनविभागाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात नेले. जखमी बिबटवर तेथेच उपचार करण्यात येणार असल्याचे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

पुढारी ५.५.२०

# मेट्रो कारशेडसाठी उत्तनमधील जागेची चाचपणी

## भाईंदरमध्ये विरोध झाल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा निर्णय

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

एमएमआरडीएने मेट्रो प्रकल्प क्रमांक ७ व ९ करिता भाईंदर येथील मुर्धा, राई व मोर्वा गावातील सुमारे ३५ हेक्टर जागेत सुरुवातीला कारशेड प्रस्तावित केली. त्याला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार प्रस्तावित कारशेड उत्तनच्या मौजे डोंगरी येथील सर्वे क्रमांक १९ वरील सरकारी जागेत प्रस्तावित केली आहे. त्याची चाचपणी करण्यासह जागेची हद्द विविध शासकीय विभागातील अधिकाऱ्यांकडून निश्चित करण्यात आली आहे.



एमएमआरडीएने पूर्वी भाईंदर पश्चिमेकडील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानामागील मिठागरांच्या जागेत मेट्रो कारशेड प्रस्तावित केली होती. त्याला केंद्रीय मीठ विभागाची परवानगी मिळण्याची शक्यता धूसर झाल्याने ही कारशेड त्यापुढील मुर्धा, राई व मोर्वा गावातील सुमारे ३५ हेक्टर जागेत स्थानिक ग्रामस्थांना विचारात न घेता प्रस्तावित केली. यात ग्रामस्थांची शेतजमीन, घरे व जागा मोठ्या प्रमाणात बाधित झाल्याने ग्रामस्थांनी त्याला तीव्र विरोध दर्शविला. याप्रकरणी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात भेट घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएला उत्तन येथील पर्यायी सरकारी जागेची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्याचा अहवाल एमएमआरडीएने अद्याप मुख्यमंत्र्यांना पाठविला नसल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले असले तरी कारशेडसाठी उत्तनच्या मौजे डोंगरी येथील सर्वे क्रमांक १९ वरील सरकारी जागा तूर्तास निश्चित केली आहे. तेथील जमीन संपादनाबाबतच्या नोटिसा संबंधित जागा मालकांना महसूल विभागाकडून पाठविण्यात आल्या असून जागेचा सर्वेदेखील करण्यात आला. या सर्वेक्षणाच्या नकाशामध्ये जागेच्या सभोवताली १२ मीटर रुंद रस्ता दर्शविण्यात आला असून २३ मार्च रोजी ठाणे येथील भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी, एमएमआरडीए प्राधिकरणाचे कर्मचारी व मिरा-भाईंदर येथील अप्पर तहसीलदार कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी जागेची हद्द देखील निश्चित केल्याचे सांगण्यात आले.

### तूर्तास ग्रामस्थांना मिळाला दिलासा

**सदर जागा काही प्रमाणात डोंगराळ असल्याने त्याची उंची सुमारे ५०० ते ७०० मीटर इतकी आहे. त्यामुळे कारशेडसाठी या जागेचे सपाटीकरण करावे लागणार आहे. जागा व हद्द निश्चितीचा अहवाल एमएमआरडीए प्राधिकरणामार्फत तयार करून तो मुख्यमंत्र्यांना सादर केला जाणार आहे. त्यानंतर शासन त्यावर निर्णय घेण्यात येत आहे. त्यामुळे तूर्तास तरी मुर्धा, राई व मोर्वा ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे.**

लोकमत

# पात्र शिपाई, चालकांची रविवारी लेखी परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पोलिस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर सुरू असलेल्या पोलिस शिपाई-चालकपदाच्या प्रक्रियेमध्ये शारीरिक चाचणी व कौशल्य चाचणीमधून लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्या उमेदवारांची लेखी परीक्षा रविवारी सकाळी साडेआठ ते दहा वाजण्याच्या दरम्यान मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्त कार्यालय, दुसरा माळा, संवाद हॉल, राष्ट्रसंत आचार्य श्री पद्मसागर सुरईश्वरजी भवन, सेक्टर ५, मीरा रोड येथे घेण्यात येणार आहे.

सर्व उमेदवारांनी वेळेमध्ये परीक्षेच्या ठिकाणी हजर राहणे बंधनकारक आहे. परीक्षा सुरू झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवारांनी परीक्षेसाठी येताना महाआयटीकडून दिलेले प्रवेशपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. लेखी परीक्षेसाठी ओळखपत्राशिवाय उमेदवारास प्रवेश देण्यात येणार नाही. महाआयटीकडून ओळखपत्र प्राप्त न झाल्यास मुदतीत या कार्यालयास संपर्क करावा. उमेदवारांना पॅड व काळ्या शाईचे पेन परीक्षेवेळी या कार्यालयाकडून पुरविले जाणार आहे. यामुळे इतर कोणतेही साहित्य परीक्षा केंद्रावर आणण्यास मनाई आहे. उमेदवारांनी मोबाइल, स्मार्ट वॉच, गणकयंत्र इतर कोणतेही ब्लुटूथ यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे, तसे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार इतर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याचेवर कायदेशीर कारवाई केली जाईल व संबंधित उमेदवारास पुढील पोलिस भरती प्रक्रियेतून तत्काळ बाद करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## प्रवेशपत्र ऑनलाइन डाउनलोड करता येणार

१ लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाइन डाउनलोड करता येणार आहे.

२ सर्व पोलिस शिपाई, चालक लेखी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी रविवारी सकाळी साडेसहा वाजता लेखी परीक्षेसाठी हजर राहावे.

३ ही पोलिस शिपाई चालक भरती लेखी परीक्षा पारदर्शकपणे पार पाडण्याकरिता सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.



Scanned with CamScanner

दैंनिक
सनसनी अबतक
मुंबई,शनिवार 25 मार्च 2023


# मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय द्वारा उत्तम कार्य पर पुलिस अधिकारी हुए सम्मानित

## कमिश्नर मधुकर पांडेय के हाथो मिला सम्मान चिन्ह

वसई : फरवरी २०२३ में उत्कृष्ट प्रदर्शन करने वाले पुलिस अधिकारी व पुलिस कर्मचारियों को मीरा-भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय ने प्रशस्ति-पत्र व पुरस्कार देकर उन्हें सम्मानित कर उनका मनोबल काम के प्रति मनोबल बढ़ाया है। यह सम्मान पत्र मासिक अपराध समीक्षा बैठक में दिया गया है।यह जानकारी पुलिस अधिकारी ने शुक्रवार को दी है। बताया गया है कि एमबीवीवी पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय ने अपने हाथों सहायक पुलिस निरीक्षक (क्राइम ब्रांच यूनिट ०१) पुष्पराज सुर्वे, पुलिस निरीक्षक शाहूराज रणवरे (क्राइम ब्रांच वसई यूनिट ०२),तुलिंज पुलिस स्टेशन (सीनियर पी.आई ) शैलेंद्र नगरकर,पुलिस निरीक्षक (क्राइम ब्रांच यूनिट ०३ ) प्रमोद बड़ाख व पुलिस निरीक्षक (साइबर क्राइम ब्रांच ) सुजितकुमार गुंजकर को प्रशस्ति-पत्र व पुरस्कार देकर उनको गौरवान्वित किया। ज्ञात हो कि उक्त पुलिस अधिकारियों की उपस्थिति में पुलिस टीम द्वारा फरवरी २०२३ में विभिन्न गंभीर अपराधों में अपराधियों को धर दबोच कर मामलों को सुलझाया गया, जिस लिए कमिश्नर मधुकर पांडेय के हाथो पुलिस अधिकारियों को सम्मानित किया गया।



Scanned with CamScanner

# तुलिंज पुलिस स्टेशन की हद में ड्रग्स के साथ नाइजीरियन गिरफ्तार

## क्राइम डिटेक्शन टीम की कार्रवाई काबिलेतारीफ, दस लाख से अधिक कीमत का ड्रग्स बरामद

**वसई :** मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत तुलिंज पुलिस स्टेशन की हद से ड्रग्स के नाइजीरियन गिरफ्तार होने का मामला सामने आया है। जिसमें बताया गया कि आरोपी के पास 10 लाख रूपए कीमत से अधिक का माल बरामद हुआ है और यह कार्रवाई तुलिंज पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन टीम द्वारा की गई है, जो कि काबिले तारीफ है। बता दे नालासोपारा पूर्व क्षेत्र से एक नाईजीरियन शख्स को पकड़ा गया है, जिसके पास से लाखों रुपये कोकीन ड्रग्स जप्त किया है। यह कार्रवाई परिमंडल 3 डीसीपी सुहास बावचे व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन तुलिंज थाने के सीनियर पी.आई शैलेन्द्र नगरकर के नेतृत्व में क्राइम डिटेक्शन की टीम ने की है।गौरतलब है कि इसके पहले भी इसी महीने (मार्च ) में नालासोपारा पूर्व के प्रगति नगर क्षेत्र से तुलिंज पुलिस ने एक नाईजीरियन के पास से 58 लाख 74 हजार रुपये की भारी मात्रा में ड्रग्स की एक बड़ी खेप जप्त की थी। यह मामला शांत नहीं हुआ,फिर 23 मार्च को नालासोपारा पूर्व के मोरेगांव तालाब स्थित तुलिंज पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन टीम ने एक 54 वर्षीय नाईजीरियन को कोकीन नामक ड्रग्स के साथ गिरफ्तार कर ली। पुलिस के मुताबिक, नाईजीरियन शख्स कोकीन की विक्री करने हेतु आया था,पुलिस ने गुप्त सूचना के आधार पर कार्रवाई कर उसे पकड़ लिया है। पुलिस ने बताया कि नाईजीरियन आरोपी (ओके चिमा गॅब्रील अँगु ) के पास से 104 ग्राम वजन कोकीन ( कीमत - 10,40,000 रुपये ) बरामद किया गया है। पुलिस ने कहा कि आरोपी नाईजीरियन को गिरफ्तार किया गया है, उसके खिलाफ तुलिंज थाना में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। पुलिस आयुक्तालय की जिला स्तरीय नारकोटिक्स रोधी कार्यकारी समिति की ऑनलाइन बैठक हुई जिसमें खाद्य एवं औषधि प्रशासन, सीमा शुल्क विभाग, राज्य आबकारी विभाग, स्वास्थ्य विभाग ने भाग लिया।




Scanned with CamScanner

लोकमत

# पोलिस ठाण्यात तक्रारदारांना चांगली वागणूक मिळते का?

## शहरात ४,८२० सीसीटीव्ही; 'एक कॅमेरा शहरासाठी'ला नागरिकांचा प्रतिसाद

मंगेश कराळे

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या अंतर्गत लोकसहभागातून सीसीटीव्हीचे जाळे तयार झाले आहे. गुन्हेगारांचा मागोवा घेण्यासाठी पोलिसांतर्फे सुरू केलेल्या 'एक कॅमेरा शहरासाठी' या उपक्रमाला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद आहे. आतापर्यंत आयुक्तालयांतर्गत ४,८२० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत.

'एक कॅमेरा शहरासाठी' हा उपक्रम वसई-विरारमध्ये सुरु केला होता. त्यानुसार शहरातील आस्थापने, मॉल, हॉटेल, कार्यालये, स्थानिक वसाहती, शैक्षणिक संस्था यांच्याकडील सीसीटीव्ही कॅमेरा सामाजिक जबाबदारीतून रस्त्याच्या दिशेने वळविण्याचे पोलिसांनी आवाहन केले होते. त्यानुसार संस्था, आस्थापना मालक, नागरिकांच्या सहभागातून सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत.

### आयुक्तालयात १७ पोलिस ठाणे

मीरा-भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालयांतर्गत आचोळे, अर्नाळा, भाईंदर, काशिमीरा, मांडवी, माणिकपूर, मीरा रोड, नायगाव, नालासोपारा, नवघर, नयानगर, पेल्हार, तुळींज, उत्तन सागरी, वसई, विरार आणि वालीव हे १७ पोलिस ठाणे आहेत.




### सर्व सीसीटीव्ही सुरु

- सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे रस्त्यावरील घडणाऱ्या बहुतांश गुन्हे व त्याचा तपास हा यामुळे शक्य होतो.
- गुन्हेगाराचा शोध घेण्यासाठी चांगला फायदा झाला आहे. सर्वच पोलिस ठाण्यांतील सीसीटीव्ही सुरु आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष असते.

### सर्वच पोलिस ठाण्यांत सीसीटीव्ही

शहरात घडलेल्या गुन्ह्याचे चित्रण व त्याआधारे माहिती घेऊन गुन्ह्याचा तपास अधिक प्रभावीपणे करण्यास मोठी मदत मिळते. सर्वच पोलिस ठाण्यांतर्गत परिसरात सीसीटीव्ही लावण्यात आले असून या सर्वांची नोंद स्थानिक पोलिस ठाण्यांकडे आहे.

### तक्रारदारांना चांगली वागणूक

मोबाइल हरवल्याने पोलिस ठाण्यात तक्रारीसाठी गेल्यावर तेथे पोलिसांनी चांगली वागणूक देऊन गुन्हा दाखलची प्रक्रिया सुरु केली. मोबाइल नंबरचे सीडीआर व लोकेशन काढण्यासाठी कर्मचाऱ्यांना सांगितले.
**- एक तक्रारदार**

मित्राची मुलगी क्लासला गेली होती; पण ती परतलीच नाही. आजूबाजूला, सर्वत्र शोध घेतला पण ती सापडली नाही. शेवटी पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार घेत अपहरणाचा गुन्हा दाखल करून शोध घेण्यास सुरुवात केली.
**- तक्रारदार**

### घटनेचा पुरावा म्हणून मदत

आयुक्तालयाअंतर्गत सीसीटीव्हीमुळे शहरात घडलेल्या गुन्ह्याचे चित्रण व त्याआधारे माहिती घेऊन तपास प्रभावीपणे करण्यास मदत मिळते. घटनेचा पुरावा म्हणून मदत मिळत असते. **- पोलिस प्रशासन**





Scanned with CamScanner

लोकमत

# नायजेरियनकडून कोकेन जप्त

नालासोपारा : नालासोपाऱ्यात नायजेरियनकडून लाखोंचे कोकेन जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. मोरेगाव तलाव, प्रियंका अपार्टमेंटसमोर गुरुवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास नायजेरियन व्यक्ती ओके चिमा गॅबरील ऍंगू (५४) याच्या ताब्यात पोलिसांना १०४ ग्रॅम वजनाचा कोकेन हा अंमली पदार्थ व रोख रक्कम असा १० लाख ४० हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला होता. तुळींज पोलिसांनी एनडीपीएस कायद्याखाली गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.

Hello Vasai
Page No. 3 Mar 25, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

दैनिक
यशोभूमि
वर्ष 28 . अंक 11 . मुंबई, शुक्रवार, 24 मार्च 2023
पृष्ठ 10 . मूल्य 5.00 रुपये

# विरार में सामूहिक बलात्कार, दो आरोपी गिरफ्तार

**विरार (प्रतिनिधि),** स्थानीय पुलिस स्टेशन अंतर्गत क्षेत्र में बुधवार की शाम दो आरोपियों ने एक 19 वर्षीय युवती के साथ सामूहिक दुष्कर्म किया। पुलिस ने विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज कर दोनों आरोपियों को गिरफ्तार कर लिया है।

जानकारी के अनुसार 19 वर्षीय युवती ने विरार पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज कराई। दर्ज मामले के अनुसार पीड़िता और उसका प्रेमी बुधवार की शाम विरार क्षेत्र के एक परिसर में बैठे थे। उसी दौरान दो शख्स आकर उसके प्रेमी के गले से सोने का पेंडेंट खींचकर फरार हो गए। कुछ समय पश्चात दोनों शख्स पुनः वापस आए दोनों ने मिलकर पीड़िता के साथ सामूहिक दुष्कर्म किया। जब पीड़िता के प्रेमी ने विरोध करते हुए साइड में पड़ी कांच की बोतल से एक शख्स के सिर पर वार कर दिया तब दोनों शख्स फरार हो गए। सूचना मिलते ही मौके पर पुलिस पहुंच गई। पुलिस ने पीड़िता को उपचार के लिए अस्पताल भेज दिया। संबंधित मामले में पुलिस ने दोनों आरोपियों के खिलाफ विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज कर लिया है। पुलिस को शक हुआ कि घायल आरोपी शायद उपचार के लिए डॉक्टर के पास गया होगा। पुलिस ने त्वरित जांच पड़ताल शुरू कर दिया। उसी दौरान पुलिस को सूचना मिली कि एक डॉक्टर ऐसे ही एक मरीज का इलाज कर रहा है। मौके पर पहुंचकर पुलिस ने दोनों को हिरासत में ले लिया। फिलहाल संबंधित मामले में पुलिस आगे की कार्रवाई में जुट गई है।

Scanned with CamScanner

लोकमत

# नायजेरियनकडून कोकेन जप्त

नालासोपारा : नालासोपाऱ्यात नायजेरियनकडून लाखोंचे कोकेन जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. मोरेगाव तलाव, प्रियंका अपार्टमेंटसमोर गुरुवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास नायजेरियन व्यक्ती ओके चिमा गॅबरील ऐंगू (५४) याच्या ताब्यात पोलिसांना १०४ ग्रॅम वजनाचा कोकेन हा अंमली पदार्थ व रोख रक्कम असा १० लाख ४० हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला होता. तुळींज पोलिसांनी एनडीपीएस कायद्याखाली गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.

Hello Vasai
Page No. 3 Mar 25, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# पात्र शिपाई, चालकांची रविवारी लेखी परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पोलिस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर सुरू असलेल्या पोलिस शिपाई-चालकपदाच्या प्रक्रियेमध्ये शारीरिक चाचणी व कौशल्य चाचणीमधून लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्या उमेदवारांची लेखी परीक्षा रविवारी सकाळी साडेआठ ते दहा वाजण्याच्या दरम्यान मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्त कार्यालय, दुसरा माळा, संवाद हॉल, राष्ट्रसंत आचार्य श्री पद्मसागर सुरईश्वरजी भवन, सेक्टर ५, मीरा रोड येथे घेण्यात येणार आहे.

सर्व उमेदवारांनी वेळेमध्ये परीक्षेच्या ठिकाणी हजर राहणे बंधनकारक आहे. परीक्षा सुरू झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवारांनी परीक्षेसाठी येताना महाआयटीकडून दिलेले प्रवेशपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. लेखी परीक्षेसाठी ओळखपत्राशिवाय उमेदवारास प्रवेश देण्यात येणार नाही. महाआयटीकडून ओळखपत्र प्राप्त न झाल्यास मुदतीत या कार्यालयास संपर्क करावा. उमेदवारांना पॅड व काळ्या शाईचे पेन परीक्षेवेळी या कार्यालयाकडून पुरविले जाणार आहे. यामुळे इतर कोणतेही साहित्य परीक्षा केंद्रावर आणण्यास मनाई आहे. उमेदवारांनी मोबाइल, स्मार्ट वॉच, गणकयंत्र इतर कोणतेही ब्लुटूथ यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे, तसे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार इतर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याचेवर कायदेशीर कारवाई केली जाईल व संबंधित उमेदवारास पुढील पोलिस भरती प्रक्रियेतून तत्काळ बाद करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## प्रवेशपत्र ऑनलाइन डाउनलोड करता येणार

१ लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाइन डाउनलोड करता येणार आहे.

२ सर्व पोलिस शिपाई, चालक लेखी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी रविवारी सकाळी साडेसहा वाजता लेखी परीक्षेसाठी हजर राहावे.

३ ही पोलिस शिपाई चालक भरती लेखी परीक्षा पारदर्शकपणे पार पाडण्याकरिता सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

Hello Vasai
Page No. 3 Mar 25, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner